RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ५१] मंगळवार, जून २३, २०२०/आषाढ २, शके १९४२ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २३ जून २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक एडीआर-२०२० / प्र.क्र.३५/तांशि-६.--- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम ,२०१५( सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८) याच्या कलम २३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व दृश्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :---

**१.** या नियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व दृश्यकला पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२०, असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व दृश्यकला पाठ्यक्रमाच्या प्रवेशाचे विनियमन) नियम,२०१७(यात यापुढे ज्याचा निर्देश," मुख्य नियम "असा केला आहे) याच्या नियम २ मधील,---

(१) खंड (छ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :---

"(छ) "पाठ्यक्रम" याचा अर्थ, रेखा व रंग कला, वस्त्र कला, अंतर्गत सजावट, शिल्पकला, धातू कला, मृत्तिकाशिल्प, उपयोजित कला व अभिकल्प यांमधील पूर्णवेळ पदवीपूर्व आणि पदव्युत्तर दृश्यकला पाठ्यक्रम, असा आहे;";

(२) खंड (ड) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :---

"(ड-१) "जम्मू व काश्मीर "याचा अर्थ, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र,असा आहे;".

**३.** मुख्य नियमांच्या नियम ७ मधील, पोट-नियम (५) मध्ये, खंड (क) मधील, उप-खंड (दोन) नंतर, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :---

"परंतु, जर आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असलेल्या एखाद्या पाठ्यक्रमातील जागा रिक्त राहिल्या तर,अशा रिक्त जागा, भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांमधून भरण्यात येतील आणि जर भारताचे समुद्रपार नागरिक(ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती(पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्या तर,अशा रिक्त जागा, आखाती देशांतील भारतीय कामगारांच्या मुलांमधून भरता येतील:

परंतु आणखी असे की,वरील दोन्ही कोट्यातील कोणतीही रिक्त जागा, अनिवासी भारतीयांच्या जागांसाठी समुचित प्राधिकरणाकडून मान्यता घेण्यास अधीन राहून,अनिवासी भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून भरता येईल.".

**४.** मुख्य नियमांच्या नियम ९ मधील,---

(१) पोट-नियम (१) मध्ये,---

(एक) खंड (घ) मध्ये,"उमेदवाराने" या मजकुरानंतर, "या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पध्दतीने"हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (ड.) मध्ये, "तक्रारी असल्यास," या मजकुरानंतर, "या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पध्दतीने"हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(तीन) खंड (झ) मध्ये, "उमेदवाराने" या मजकुरानंतर "देऊ केलेली जागा स्वीकारण्याच्या आणि या नियमांच्या पोट-नियम (४) च्या खंड(ड.) नुसार,चुका दुरुस्त करण्याच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पध्दतीने "हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

(२) पोट-नियम (४) मध्ये,---

(एक) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी व तिसरी फेरी आयोजित करणे.-" या शीर्षकाऐवजी पुढील शीर्षक दाखल करण्यात येईल :---

"केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी फेरी आयोजित करणे.-";

(दोन) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :---

“(क) दुसऱ्या फेरीकरिता उपलब्ध असलेल्या जागा, संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. दुसऱ्या फेरीकरिता पात्र असलेल्या उमेदवारांना, ऑनलाइन पद्धतीने विकल्प नमुना भरण्यासाठी आणि/किंवा पूर्वीच्या प्रवेश फेरीसाठी उमेदवाराने भरलेल्या विकल्प नमुन्यामध्ये बदल करण्यासाठी मुभा देण्यात येईल . या प्रवेश फेरीमध्ये वाटप करावयाच्या जागा, पुढील प्रवर्गांमध्ये मोडणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी उपलब्ध असतील :---

(एक) वरील पोट-नियम (३) (ग) व (३) (घ) नुसार असलेले उमेदवार;

(दोन) ज्यांना पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये कोणतीही जागा वाटप करण्यात आलेली नाही असे उमेदवार;

(तीन) जे पूर्वीच्या प्रवेश फेरीत सहभागी झालेले नव्हते (विकल्प नमुना भरण्यास निष्फळ ठरलेले) असे उमेदवार.";

(तीन) खंड (ग) मध्ये, "तिसरी प्रवेश फेरी "हा मजकूर, ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी "दुसरी प्रवेश फेरी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारा□सह दाखल करण्यात येईल;

(चार) खंड (च) वगळण्यात येईल.

**५.** मुख्य नियमांच्या नियम १० मधील,---

(१) पोट-नियम (१) मध्ये, टप्पा-१ मधील, उप-खंड (घ) व (ड.) याऐवजी, पुढील उपखंड दाखल करण्यात येतील :----

"(घ) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप,----

(एक) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप, केवळ त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गामध्येच करण्यात येईल;

(दोन) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध जागांची संख्या, त्या पाठ्यक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उपलब्ध जागांनुसार विनिर्दिष्ट पाठ्यक्रमाच्या एकूण संख्येमध्ये नमूद करण्यात येईल;

(तीन) जर विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा, त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील विहित आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पूर्णांकात येत असतील तरच (अपूर्णांक संख्या पूर्णांकात रूपांतरित करण्यास परवानगी नाही) केवळ अशा जागा, विकलांग व्यक्तींच्या त्या विशिष्ट आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आरक्षित म्हणून राखीव ठेवण्यात येतील आणि त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील;

(चार) त्या पाठ्यक्रमासाठी, विकलांग व्यक्ती प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी उपलब्ध असलेल्या इतर सर्व जागा (राखून ठेवलेल्या जागांखेरीज), विकलांग व्यक्ती प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या संयुक्त यादीतील त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील:

परंतु, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार त्याच राखीव प्रवर्गातून एकापेक्षा अधिक जागा भरण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, वरील परंतुकाच्या तरतुदीमुळे जागा वाटपासाठी विचार न झालेल्या उमेदवारांचा, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार, सर्वसाधारण विकलांग व्यक्ती प्रवर्गातील जागांचे वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल;

(पाच) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवाराच्या जागांचे वाटप केल्यानंतर, त्या सर्वसाधारण किंवा संबंधित मागास वर्ग प्रवर्गातील व विकलांग व्यक्ती प्रवर्गातील जागा, उपयोगात आणल्याचे समजण्यात येईल;

(सहा) जर कोणत्याही पाठ्यक्रमाच्या जागांच्या सारणीमध्ये, राखीव किंवा सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागा, दोनपेक्षा कमी असतील तर, अशा बाबतीत,विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारास, कोणतीही जागा वाटप करण्यात येणार नाही.

(ड.) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाट,---

(एक) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप, केवळ त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गामध्येच करण्यात येईल;

(दोन) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध जागांची संख्या, त्या पाठ्यक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उपलब्ध जागांनुसार विनिर्दिष्ट पाठ्यक्रमाच्या एकूण संख्येमध्ये नमूद करण्यात येईल;

(तीन) जर संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा, त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील विहित आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पूर्णांकात येत असतील तरच (अपूर्णांक संख्या पूर्णांकात रूपांतरित करण्यास परवानगी नाही) केवळ अशा जागा, संरक्षण दलाच्या त्या विशिष्ट आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आरक्षित म्हणून राखीव ठेवण्यात येतील आणि त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील;

(चार) त्या पाठ्यक्रमासाठी, संरक्षण दल प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी उपलब्ध असलेल्या इतर सर्व जागा (राखून ठेवलेल्या जागांखेरीज), विकलांग व्यक्ती प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या संयुक्त यादीतील त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील:

परंतु, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार त्याच राखीव प्रवर्गातून एकापेक्षा अधिक जागा भरण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, वरील परंतुकाच्या तरतुदीमुळे जागा वाटपासाठी विचार न झालेल्या उमेदवारांचा, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार, संरक्षण दल प्रवर्गाच्या सर्वसाधारण जागांमधील जागांचे वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल;

(पाच) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवाराच्या जागांचे वाटप केल्यानंतर, त्या सर्वसाधारण किंवा संबंधित मागास वर्ग प्रवर्गातील व संरक्षण दल प्रवर्गातील जागा, उपयोगात आणल्याचे समजण्यात येईल;

(सहा) जर कोणत्याही पाठ्यक्रमाच्या जागांच्या सारणीमध्ये, राखीव किंवा सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागा, दोनपेक्षा कमी असतील तर, अशा बाबतीत,संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारास, कोणतीही जागा वाटप करण्यात येणार नाही.”.

**६.** मुख्य नियमाच्या नियम ११ मधील,----

(१) “केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅपच्या) पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीद्वारे जागांचे वाटप करणे.-” या शीर्षकाऐवजी पुढील शीर्षक दाखल करण्यात येईल :---

“केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅपच्या) पहिल्या व दुसऱ्या फेरीद्वारे जागांचे वाटप करणे.-”;

(२) पोट-नियम (१) मध्ये, “केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) पहिली, दुसरी व तिसरी फेरी” या मजकुराऐवजी, “केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) पहिली व दुसरी फेरी” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) पोट-नियम (३) वगळण्यात येईल;

(४) पोट-नियम (४) मधील, "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) तिसऱ्या फेरीमध्ये"या मजकुराऐवजी "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) दुसऱ्या फेरीमध्ये"हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य नियमाच्या नियम १२ मधील,खंड (क) मध्ये, ज्या दोन ठिकाणी “कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीमध्ये ” हा मजकूर आला आहे त्या ठिकाणी" कॅपच्या पहिल्या व दुसऱ्या फेरीमध्ये" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

**८.** मुख्य नियमाच्या नियम १३ मधील, खंड (ज) नंतर, पुढील खंड ज्यादा दाखल करण्यात येतील :---

“ (झ) या जागा भरताना परस्परांतील गुणवत्तेच्या आधारे, अखिल भारतीय उमेदवारांपेक्षा महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल;

(ञ) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला महाराष्ट्र राज्य उमेदवार व अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार यांचा समावेश केल्यानंतर, जर मंजूर प्रवेश क्षमतेतील कोणतीही जागा रिक्त राहात असेल तर, या जागा, या जागा भरण्यासाठी समुचित प्राधिकरणाकडून मान्यता मिळण्यास अधीन राहून, अनिवासी भारतीय, विदेशी विद्यार्थी (एफएन), भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले ही उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून भरता येतील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश तिडके,**
शासनाचे उपसचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,

dated the 23rd June 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. ADR-2020/C.R.35/TE-6.—In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Education Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Visual Art Course) Rules, 2017, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Visual Art Course) (Amendment) Rules, 2020.

**2.** In rule 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of admission to the Full Time Professional Visual Art Course) Rules, 2017 (hereinafter referred to as "the principal Rules"),—

(*1*) For clause (*g*), the following clause shall be substituted, namely :—

"(*g*) "Courses" means the full time undergraduate and post graduate Visual Art courses in Fine Art, Drawing and Painting, Textile Design, Interior Decorator, Sculpture, Metal Works, Ceramics, Applied Art and Design;";

(*2*) After clause (*m*), the following clause shall be inserted, namely :-

"(*m-1*) "Jammu and Kashmir" means the Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh;".

**3.** In rule 7 of the principal Rules, in sub-rule (*5*), in clause *(a),* after sub-clause *(ii),* the following provisos shall be added, namely :—

"Provided that, if seats in a course reserved for children of Indian Workers in Gulf Countries remains vacant, then such vacant seats shall be filled in from the candidates of OCI, PIO or Foreign Students and if seats reserved for candidates of OCI, PIO or Foreign Students remains vacant then such vacant seats shall be filled in from the children of Indian Workers in Gulf Countries :

Provided further that, any vacant seat in both the above quota may be filled in from NRI Candidature Candidates, subject to the approval from appropriate authority for the NRI seats.".

**4**. In rule 9 of the principal Rules,—

(*1*) in sub-rule (*1*),—

(*i*) in clause (*d*), after the words "by the Candidate" the words "through the method prescribed by the Competent Authority for this purpose " shall be inserted ;

(*ii*) in clause (*e*), after the words "if any," the words "through the method prescribed by the Competent Authority for this purpose" shall be inserted ;

(*iii*) in clause (*i*), after the words "the Competent Authority" the words "through the method prescribed by the Competent Authority for the purpose of accepting the offered seat and rectifying the errors as per the clause (*e*) of sub-rule (*4*) of this rule" shall be added ;

(*2*) in sub-rule (*4*),—

(*i*) for the heading "Conduct of CAP Round-II and III", the following heading shall be substituted, namely :—

" Conduct of CAP Round-II";

(*ii*) for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

"(*a*) The seats available for Round II shall be published on the website. The candidates eligible for round II are allowed to fill in and/or edit online option form filled in by the candidate for the previous round. The seats to be allotted during this round shall be available to the eligible candidates falling under the following categories,—

*(i)* Candidates as per sub-rule (*3*)(*c*) and (*3*)(*d*) above;

(*ii*) Candidates who have not been allotted any seat in the previous round;

(*iii*) Candidates who did not participate (failure of filling option form) in previous round." ;

(*iii*) in clause (*c*), for the word and letters "round III" wherever they occurred, the word and letters "round II" shall be substituted ;

(*iv*) clause (*f*) shall be deleted.

**5**. In rule 10 of the principal Rules,—

(*1*) in sub-rule (*1*), in Stage – I, for sub-clauses (*d*) and *(e),* the following sub-clauses shall be substituted, namely :—

"*(d) Allotment to the Persons with Disability Category Candidates*.-

(*i*) Allotment of seats to the Persons with Disability Category Candidates shall be within their respective Reserved or General category only.

(*ii*) The number of seats available for the Persons with Disability Category Candidates shall be indicated in total number for the specific course as per the seats available in the CAP for that course.

(*iii*) If the seat for Persons with Disability Category Candidates as per their prescribed reservation percentage within their respective reserved or general

category comes out to be complete integer (no rounding off the fractional value is permissible) then only such seat shall be earmarked as reserved for that particular reserved or general category for Persons with Disability candidate and shall be allotted as per their *Inter-Se-Merit*.

(*iv*) All other seats (except earmarked seats) available for Persons with Disability Category Candidates for that course shall be allotted as per their *Inter-Se-Merit* from combined list of all Persons with Disability Category Candidates :

Provided that, not more than one seat shall be filled in from same reserved category as per their *Inter-Se-Merit :*

Provided further that, the candidate not considered for allotment due to provision of above proviso, shall be considered for allotment of seat from general Persons with Disability Category as per their *Inter-Se-Merit*.

(*v*) After allotment of the seat to Person with Disability Category Candidate, a seat from that General or respective Backward Class Category and Person with Disability Category shall be treated as utilized.

(*vi*) If in the seat matrix for any course, total available seats for Reserved or General category comes out to be less than two, then in such case, no seat shall be allotted to the Person with Disability Category Candidate.

*(e) Allotment to the Defence Category Candidates.—*

(*i*) Allotment of seat to the Defence Category Candidates shall be within their respective Reserved or General category only.

(*ii*) The number of seats available for the Defence Category Candidates shall be indicated in total number for the specific course as per the seats available in the CAP for that course.

(*iii*) If the seat for Defence Category Candidates as per their prescribed reservation percentage within their respective reserved or general category comes out to be complete integer (no rounding off the fractional value is permissible) then only such seat shall be earmarked as reserved for that particular reserved or general category for Defence Category candidate and shall be allotted as per their *Inter-Se-Merit*.

(*iv*) All other seats (except earmarked seats) available for Defence Category Candidates for that course shall be allotted as per their *Inter-Se-Merit* from combined list of all Defence Category Candidates :

Provided that, not more than one seat shall be filled in from same reserved category as per their *Inter-Se-Merit :*

Provided further that, the candidate not considered for allotment due to the above provision, shall be considered for the allotment of seat from general seats for Defence Category as per their *Inter-Se-Merit*.

(*v*) After allotment of the seat to Defence Category Candidate a seat from that General or respective Backward Class Category and Defence Category shall be treated as utilized.

(*vi*) If in the seat matrix for any course, total available seats for Reserved or General category comes out to be less than two, then in such case, no seat shall be allotted to the Defence Category Candidate.".

**6**. In rule 11 of the principal Rules,—

(*1*) for the heading "*Allotment of seats by CAP Rounds I, II and III.-*", the following heading shall be substituted, namely :—

"*Allotment of seats by CAP Rounds I and II.-*";

(*2*) in the sub-rule (*1*), for the letters and words "CAP Round I, II, and III" the words "CAP Rounds I and II" shall be substituted ;

(*3*) sub-rule (*3*) shall be deleted ;

(*4*) in the sub-rule (*4*), for the words and letters "In CAP Round III" the words and letters "In CAP Round II" shall be substituted.

7. In rule 12 of the principal Rules, in clause (*a*), for the letters and words "CAP Rounds- I, II, and III" at both the places, the letters and words "CAP Rounds-I and II" shall be substituted.

**8**. In rule 13 of the principal Rules, after the clause (*h*), the following clauses shall be added, namely :—

"(*i*) While filling these seats the preference shall be given to Maharashtra State Candidature Candidate over All India Candidature Candidate on the basis of *Inter-Se-Merit*.

(*j*) After exhausting Maharashtra State Candidature Candidate and All India Candidature Candidate, if any seat remain vacant in the Sanctioned Intake then these seats may be filled with NRI, Foreign Students (FN), Overseas Citizen of India (OCI), Persons of Indian Origin (PIO), Children of Indian Workers in the Gulf Countries (CIWGC) Candidature Candidates, subject to the approval from appropriate authority for these seats.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.